Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

# सामाजिक आरोग्याचा मारेकरी

श्री. सतीश घाडगे,
गो. ए. सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविदयालय, संगमनेर,
जिल्हा : अहमदनगर – 422605.

**गोषवारा :**

पर्यावरणाचा विचार म्हणजे सगळयाचा विचार. उपनिषदापासून आजपर्यंत प्रत्येक काळात ज्याची विवेक बुध्दी जागृत आहे त्या प्रत्येकांनी पर्यावरणाच्या रक्षणाबद्दल, मानवाच्या भूमिकेबद्दल पोटतिडकीने सांगितले आहे.परंतु विरोधाभास असा आहे ज्या मानवावर याच्या रक्षणाची जबाबदारी आहे.तोच आपली भूमिका विसरत चालला आहे.इतर प्राणी मात्र आपले नियम, संकेत याचे कटाक्षाने पालन करतात. त्यामुळे इतरांपासून नाही पण मानवापासूनच नैसर्गिक असो वा मानवनिर्मित पर्यावरणाला धोका आहेच.पण त्याची व्याप्ती इतकी मोठी आहे की भावी पिढीसाठी आपण कशाचा वारसा ठेवणार आहोत? हा प्रश्न आहे.

बीजसंज्ञा - जैवविविधता - पर्यावरण

**प्रस्तावना :**

पर्यावरण म्हणजे पूर्वजांचा वारसा.वर्षानुवर्षाचे संचित निसर्गाने अमाप देणग्या दिल्या पण कोत्या मनोवृत्तीच्या मणुष्याला त्या स्विकारता आल्या नाहीत. निगा राखता आली नाही.हा जसा पूर्वजांचा वारसा आहे तसाच तो भावी पिढयांचा बहुमोल ठेवा आहे.त्यामध्ये केवळ मणुष्यप्राणीच अभिप्रेत नाही तर सर्व सजीवनिर्जीव सृष्टीचा समावेश त्यामध्ये होतो.

पर्यावरणाच्या गुणवत्तेचा परिणाम सजीवनिर्जीव दोन्हीवर होतो.सजीवावर त्वरीत तर निर्जिवावर मंद गतीने होतो.पर्यावरणाची गुणवत्ताही केवळ मणुष्याच्या रहिवासालाच नाही तरइतर प्राणी सुध्दा सुखाने जगू शकतील अशा प्रकारची असावी. परंतु अति हव्यासापोटी मणुष्यप्राण्याने इतरांबरोबर स्वत:चाही नाश करुन घेतला. एक दोन नव्हे तर लाखो वर्षाच्या संक्रमणातून निसर्गाची एक घडी बसलेली आहे.

**निसर्गाचे वैशिष्टये :**

निसर्गहा फार मोठा जादूगार आहे. सर्व प्राणी मात्रांना कोणताही मोबदला न घेता मुक्त हस्ताने दान देतो.एकाच ठिकाणी एकाचवेळी लावलेल्या पिकातून, झाडातून वेगवेगळया स्वादाची फळे देतो, फुले देतो.सर्व प्राणीमात्र निसर्ग नियमाचे पालन करीत असतात. मणुष्य मात्र उल्लंघन करीत असतो.हे करताना त्याने कधीच धोक्याची पातळी ओलांडलेली आहे.हे गरजेपोटी होते असे नाही तर बहुतेकवेळा हव्यासापोटी, लोभापोटी, चैनीसाठी, स्वार्थासाठी भौतिक सुखासाठी यांचे उल्लंघन होताना दिसते. यामुळे त्याचे स्वत:चे त्याने नुकसान करुन घेतलेलेच आहे पण अनावश्यक

हस्तक्षेपामुळे निसर्गाची घडी बिघडून टाकली आहे. विशेष म्हणजे हे त्याला माहित असताना समजुन उमजुन करतोय.

निसर्गात विविध प्रवृत्तीची प्राणी, वनस्पती राहतात त्यांच्या आहार विहाराच्या सवयीनुसार त्यांना अधिवास निसर्गाने दिलेला आहे. त्या मर्यादेचे ते उल्लंघन मरेपर्यंत करीत नाहीत. गरजेपेक्षा जास्त, हव्यासापेक्षा जास्त ते कधीही घेत नाहीत. पण मणुष्य सर्व नियम संकेत माहिती असूनही पायदळी तुडवत असतो.पूर्वी मानवाचा निसर्गातील हस्तक्षेप कमी होता.तरीसुध्दा त्यावेळच्या संतांनी, जाणकारांनी निसर्गावर होणा-या अतिक्रमणावर भाष्य केले आहे.

**संतांचे कार्य**

लौकीक अर्थाने ज्यांनी शालेय शिक्षणघेतले नाही त्या संतांनी मात्र या निसर्गसंवर्धनाचे महत्त्व जाणलेहोते.म्हणुन ते म्हणतात. **वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरे**तर रामदासाने आपल्या श्लोकात पुढील अपेक्षा व्यक्त केलीहोती.

**नगरेचीवसवावी,**
**जलशये निर्मावी,**
**महावने जगवावी नानविध ।**

ही अपेक्षा का व्यक्त केली तर त्या आधारे मानवालाच नाही तर अन्य प्राणी मात्रांना हीसुखाने जगता येते.1660 साली शिवाजी महाराजांनी सुध्दा राजाज्ञा काढून सरसकट झाडे तोडण्यावर सक्त ताकीद दिली होती.

पुढे सत्यशोधक समाजाची स्थापना केल्यावर महात्मा फुले यांनी 1893 साली सत्यशोधक पध्दतीने लग्न लावताना ज्या 7 प्रतिज्ञा त्यांनी नववधूवरास घ्यायला लावल्या होत्या त्यातील दुसरी प्रतिज्ञाही या संदर्भातील होती. प्राणी मात्रावर दया, प्रेमकरा, निसर्गाचे संवर्धन करा अशी सूचना त्यांनी केली होती.

वारंवार याची दखल संतानी, समाज सुधारकांना, राजांना का घ्यावीशी वाटते तर याचा संबंध जीवनाच्या अस्तीत्वाशी आहे.मणुष्य हा या निसर्गाचाविश्वस्त आहे, मालक नाही पण त्याला या उक्तीचाच विसर पडला आहे. त्यामुळे केवळ स्वत:चा स्वार्थ बघताना अन्य प्राणी सृष्टी त्याने धोक्यात आणली आहे.

**नामशेष, अस्तीत्वासाठी धोक्यात आलेलेसजीव :**

जगातील जैवविविधता धोक्यात आलेली आहे.सस्तन प्राण्याच्या 21 जाती, पक्ष्यांच्या 12 तर सरपटणारे प्राण्यांच्या 7 जाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

15-20 वर्षापूर्वी जे प्राणी पक्षी सहज बघायला मिळते ते आज आपणाला चित्रांमधूनच दाखवायला लागतात

**अस्तीत्वासाठी झगडणारे प्राणी व पक्षी**

| | | |
|---|---|---|
| गुलाबीलावा | - | शिकार |
| माळढोक | - | अधिवास धोक्यात, शिकार |
| चित्ता | - | शिकार |

| | | |
|---|---|---|
| गिधाड | - | वेदनाशामक ओषधे |
| एकशिंगीगेंडा | - | अवैधशिकार |
| कासवे | - | शिकार / जन्मस्थान धोक्यात |

यामुळे या प्राण्यांचे पक्षांचे अस्तीत्व अक्षरक्ष: अतिदक्षता विभागात ठेवल्यासारखे झालेले आहे. पूर्वी गावोगावी निसर्गाचे स्वच्छतादूत दिसत पण आज त्यांच्या संरक्षणासाठी कसोशीने प्रयत्न करावे लागतात. साहजिकच असाच वेडेपणा जर घडत राहिला तर मानवावर ती वेळ येणे दूर नाही अशी परिस्थिती त्याने स्वता:च्या हाताने रशीयात चेर्नोबिल परिसरात करुन ठेवली आहे.

जैवविविधता टिकणे टिकवणे. सर्वांसाठी मणुष्याबरोबरच, प्राणीमात्रासाठी आवश्यक आहे.कारण या निसर्गात केवळ एकाच प्रकारच्या प्राण्यांच्या संख्येत वाढ झाल्यास त्याचा विपरीत परिणाम येथील निसर्गचक्रावर होत असतो.त्यामुळे तृण भक्षक प्राणी तसेच मांस भक्षक प्राणी या दोघांचे अस्तीत्व निसर्गसंतुलनासाठी आवश्यक ठरते.

तिथे मानवाची सोय महत्वाची नसते. निसर्गसंवर्धनासाठी येथे जैवविविधता आवश्यक आहे. त्याचा मानवाला त्रास असो किंवा नसो.

दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे वर्तमानाचा विचार न करता भविष्याचा विचार मानवाने करायला हवा. सर्वांना प्राणीमात्रासकट मानवाला येथे सुखाने विनासायास जगण्याचा अधिकार आहे आणि तो निसर्गदत्त अधिकार आहे. मणुष्याने स्वता:च्या सामर्थ्याने इतरांची अवहेलना करणे, कुचंबना त्याचा हक्क हिरावून घेणे योग्य नाही.

पुन्हा दुसरा महत्वाचा भाग म्हणजे या प्राण्याचे, वनस्पतीचे, नदयांचे अस्तीत्वहा भाग मानवी जीवनाच्या सांस्कृतिक विकासासाठी उपयुक्त आहे. नदया, डोंगर, झाडे, प्राणी पक्षी यामुळे त्याचे भावजीवन समृध्द होत असते.

**केवळ भारताच्या संदर्भात कोणत्या समजुती दिसतात याचा विचार करुया**

| | | |
|---|---|---|
| नर्मदा | - | परिक्रमा |
| हिमालय | - | तप |
| पर्वत | - | गिर्यारोहन |
| चंद्र | - | चतुर्थी, चांद्रायण |
| संगम / त्रिवेणी संगम | - | पवित्र स्थळ |
| वड | - | धार्मिक महत्त्व |
| औदुंबर | - | पवित्र वृक्ष |
| नारळ | - | कल्पवृक्ष |

अस्मिता जतन करणे, जोपासणे [धार्मिक भावना] वीररस निर्माण करणे [शमीची झाडे ] इत्यादी बरीच कारणे या संदर्भात सांगता येतील. त्यामुळे केवळ उपयोगिता हाहेतू बाजूला ठेवला तरी इतर भावनांचा परिपोष आवश्यक असतो.तो

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

वेगवेगळया पातळीवर असतो. एखादयाला तुळस लावून समाधान मिळेल तर दुस-याला फुलाचे झाड लावून आनंद मिळेल,

**पर्यावरणाचे दोन प्रकार पडतात :**

1. नैसर्गिक / प्राकृतिक
2. मानवनिर्मित - यामध्ये शहर, राजकीय स्थिती, धार्मिक प्रवाह, मूल्ये, सामाजिक स्थिती

या मानवनिर्मित पर्यावरणाचा मानसाच्या, मूल्यावर सामाजिक स्थितीवर निश्चित परिणाम होतो.उदा. दहशतवाद हाविशिष्ट भू प्रदेशामध्ये दिसतो पुन्हा याला अपवाद लडाख, भूतानमध्ये तो दिसत नाही.पाकिस्तान, अफगाणिस्तान, सिरीया, या प्रदेशातच मानवनिर्मित पर्यावरण का बिघडले आहे.इराक, सुदान, सोमालिया, लेबनान, लिबिया येमेन तर दुस-या बाजुला भूतान च्या संदर्भात विचार करताना तेथील आनंदाचा निर्देशांक भारतापेक्षा जास्त आहेच पण इतर प्रगत राष्ट्राच्या इंग्लड, अमेरीका, फ्रान्स याच्या पेक्षाही जास्त आहे. विशेष म्हणजे भूतान औदयोगिक दृष्टया प्रगत राष्ट्र नाही.

तर दुसरीकडे अफगाणीस्तान, इराण, लेबनान, सिरिया चाविचार केल्यास काय दिसते रक्ष वाळवंट. या कठोर हवामानात एककल्लीविचार, भावना लवकररुजत असाव्यात. त्यामुळे येथे हा भाग ही महत्वाचा आहे. सामाजिक सलोखा जपण्यासाठी निसर्गसुध्दा समृध्द करणेगरजेचे आहे. येथे सामाजिक सलोखाहा केवळ मानवा मानवामधील अभिप्रेत नाही. आजवर फक्त माणसाणेच उलट प्रवास केला त्याने सर्व प्राणीमात्रांना हुसकावून, मारुन, त्यांचा जीव धोक्यात आणुन स्वता:चे जीवनसुखी करण्याचा प्रयत्न केला पण तोसुखी झाला नाही यास्तव आता सुलट प्रवास करुन हे नंदनवन पुन्हा फुलविण्याचा वारंवार प्रयत्न केले पाहिजेत. त्यांचा जीवनशैलीवर अतिक्रमण होणार नाही. अशा सवयी अंगी बाणवल्या पाहिजेत.

गेल्या काहीवर्षात या अविचारामुळे सस्तन प्राण्याच्या 21, पक्ष्यांच्या 12 तर सरपटणा-या प्राण्यांच्या 7 जाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. ब-याच जणांना राष्ट्रीय पक्षी, प्राणी, फूल माहित आहे.पण बहुतेक जणांना राजपक्षी, प्राणी राज्याचे फुल माहित नाही.या पृथ्वीतलावर एकही वनस्पती अशी नाही की जीचा कोणताही उपयोग नाही.मग त्या वनस्पती विषारी, काटेरीकिंवा मादक पदार्थाची निर्मिती करणारे असो.

आयुर्वेदाच्या क्षेत्रातील जीवक यांची वनस्पती शास्त्राबद्दलची गोष्ट प्रसिध्द आहे.जीवकाचे गुरुगृही शिक्षण पूर्ण झाले. तेव्हा त्याने गुरुंना विचारले, की तुम्हांला काय गुरुदक्षिणा देऊ? गुरु म्हणाले,जंगलात जा आणि अशी वनस्पती आण, जिचा औषधासाठी उपयोग नाही.जीवकाने जंगलात शोधले अखेर संध्याकाळी दमून भागून येऊन गुरुंच्या पायावर लोळण घेतली.**गुरुजी मला क्षमा करा मला अशी वनस्पतीच सापडली नाही की जिचा औषधास उपयोग नाही.**गुरुंनी त्याला जवळ घेतले आणि प्रसन्नतेने म्हणाले हीच माझी खरीगुरुदक्षिणा.

तंत्रज्ञानाच्या वापराने, औदयोगिकरणाने जसाइतर प्राणी मात्रावर परिणाम झाला आहे.तसाच मानवाच्या भाषेवर परिणाम झालेला दिसतो.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

तांत्रीकव आर्थिक दृष्टया जो समाज प्रगत आहे त्यांची भाषा या संबंधीत टिकली आहे. जे या संघर्षात टिकली आहे. जे या संघर्षात कमी पडले, त्यांची भाषा लुप्त होऊ लागली आहे. एखादी भाषा लुप्त होणे म्हणजे त्या भाषेचा व ते बोलणा-या समाजाचा सांस्कृतिक ठेवाच नष्ट होणारा आहे.

**पर्यावरण व शिक्षण :**

शिक्षणातून मानवी जीवनाशी निगडीत समस्याची दखल घेतली जाते. पर्यावरणाचे रक्षण, संवर्धनहा तर ज्वलंत विषय आहे.त्यामुळे इतर कोणत्याही विषयापेक्षा या विषयाला महत्त्व जास्त आहे.कारण मणुष्य साक्षर न झाल्याने फारसा गंभीर प्रश्न येणार नाही त्या तुलनेत, जलसाक्षरता, पर्यावरण साक्षरता खूप महत्त्वाची आहे. दैनंदिन जीवनातून, साध्या साध्या जगण्याच्या सवयीतून पर्यावरणाचे शिक्षण देणेगरजेचे आहे. हे शिक्षण केवळ सैध्दांतिक नसावे तर प्रकल्पातून भूमी प्रदूषण, जलप्रदूषण या वरच्या उपाय योजनावर भर हवा.

त्यामुळे त्याच्या भावी पिढीचे सुध्दा कल्याण होईल. पर्यावरणाचा विचार म्हणजे सगळयाचा विचार उपनिषदामध्ये [इशावास्य] जे सांगितले हया जगतात जे जे म्हणून काही आहे त्याचा अवश्य वापर कर पण दुस-याची कोणतीही गोष्ट लुबाडु नको.

याचा कालखंड लक्षात घेतल्यावर असाविचार करणारी ज्या काळात होती तो काळच श्रेष्ठ म्हटला पाहिजे.आज मात्र आपण निसर्गाचा विध्वंस करता व विकास झाला अशीहाकही पिटतो.मग तो रस्ता असेल, किंवा एखादा प्रकल्प. आणि असा विचार विशेष म्हणजे इतर प्राणी स्वाभाविकपणे करतात. हिंस्त्रवाघसिंह एकदाशिकार केल्यानंतर पुन्हा त्याच्या समोरुन प्राणी गेले तर उगाचच मारत नाही. लुबाडत नाहीत. इतर पक्ष्यासमोर धान्य ठेवल्यास हवे तेवढेच खाऊन उडून जातात. मग प्रश्न निर्माण होतो.विचार करणारा प्राणी कोण? या उपनिषदाच पालन करणारा कोण?

**संदर्भसूची :**

1. जोहरापूरकर भास्कर चौधरी जवाहर ;: 1999.पर्यावरण जाणीव जागृती, सुमेरु प्रकाशन
2. भांडारकर के.म.;: 1998. पर्यावरण शिक्षण, पुणे, नूतन प्रकाशन
3. कायदे पाटील गंगाधर ;: 2008. पर्यावरण रक्षणशैक्षणिक पर्यावरण, नासिक, चैतन्य पब्लिकेशन्स
4. अहिरराव रा.र,अलिझाड सु.सु.,वटाट तु.मा.,भोस रा.रा., धापटे व.सा., ;: पर्यावरण विज्ञान, 1995.पुणे, निराली प्रकाशन
5. कुलकर्णी दिलीप ;: 2008. हसरे पर्यावरण, पुणे, राजहंस प्रकाशन
6. www.state.gov (13/09/15)
7. Wikipedia.org.iran&state.spomeed_terrorism.factchek.org/2014/12/15-cuba.